**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीची लगबग सुरु, विविध पक्षांच्या उमेदवारांकडून शक्तिप्रदर्शन करीत अर्ज दाखल
- राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाची ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर
- विविध पक्षांमधून नाराज नेत्यांची ये-जा सुरू
- केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीची ६ हजार कोटींहून अधिक रुपये किमतीच्या २ रेल्वे प्रकल्पांना मंजुरी

  **आणि**
- पुणे कसोटीत पहिल्याच दिवशी न्यूझीलंडचा संघ २५९ धावात गारद/ दिवसअखेर भारताच्या १ बाद १६ धावा

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे. विविध पक्षांनी उमेदवार याद्या जाहीर केल्या असून, काही उमेदवारांनी अर्ज भरायला सुरुवात केली आहे.

**महाविकास** आघाडीच्या वतीने **इंदापूर** विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. **येवल्यामधून** राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ, **आंबेगावमधून** राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप वळसे पाटील, **शिर्डी** इथून भाजपचे राधाकृष्ण विखे पाटील, **कोथरुड**मधून चंद्रकांत पाटील यांनी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या जयंत पाटील यांनी सांगलीच्या

**इस्लामपूर** मतदारसंघातून तर काँग्रेच्या यशोमती ठाकूर यांनी अमरावती जिल्ह्यातल्या **तिवसा** मतदारसंघातून आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

**मुंबईत** मलबार हिल इथून भाजपचे मंगलप्रभात लोढा यांनी अर्ज दाखल केला तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी वरळी मतदार संघातून अर्ज दाखल केला.

**ठाणे** मतदारसंघात मनसेचे उमेदवार अविनाश जाधव आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार राजन विचारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. शेतकरी कामगार पक्षाकडून चित्रलेखा पाटील यांनी **अलिबाग** मतदारसंघातून अर्ज दाखल केला. रत्नागिरी जिल्ह्यात **राजापूर**मधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार राजन साळवी आणि शिवसेनेचे किरण सामंत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात **कुडाळ** विधानसभा मतदारसंघातून वैभव नाईक यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला.

अहिल्या नगर जिल्ह्यातल्या **अकोले**तून राष्ट्रवादी काँग्रेसचे किरण लहामटे, तर पारनेरमधून खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके यांनी अर्ज दाखल केला.

बीड जिल्ह्यात **परळी** विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार धनंजय मुंडे यांनी तर **कळमनुरी** इथून शिवसेनेचे संतोष बांगर यांनी महायुतीकडून अर्ज दाखल केला. **घनसावंगी** मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे राजेश टोपे यांनी तर आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी धाराशिवमधल्या **भूम परंडा**मधून अर्ज दाखल केला.

शिवसेनेच्या संजय राठोड यांनी दिग्रसमधून तर भाजपाच्या विनोद अग्रवाल यांनी गोंदियातून अर्ज दाखल केला. नागपुरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या आभा पांडे यांनी पूर्व नागपूर मतदारसंघातून अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाची विधानसभा निवडणुकीसाठी पहिली उमेदवार यादी आज जाहीर झाली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पुणे इथे वार्ताहर परिषदेत ४५ उमेदवारांची नावे जाहीर केली. बारामतीमधून युगेंद्र पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इस्लामपूरमधून जयंत पाटील, तासगाव कवठे महांकाळ इथून रोहित पाटील तर अहेरीमधून भाग्यश्री अत्राम निवडणूक लढवणार आहेत. घनसावंगीतून राजेश टोपे, काटोलमधून अनिल देशमुख, कोरेगावमधून शशिकांत शिंदे यांची नावं उमेदवार यादीत आहेत. मुंब्रा मतदारसंघातून जितेंद्र आव्हाड यांना पुन्हा संधी देण्यात आली आहेत. तर रोहित पवार यांना कर्जत जामखेडमधून उमेदवारी देण्यात आली आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते समीर भुजबळ यांनी पक्षाचा राजीनामा दिला असून नांदगाव विधानसभा मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. नांदगाव विधानसभा मतदारसंघ भयमुक्त व्हावा ही इथल्या नागरिकांची इच्छा आहे, त्यामुळे आपण इथून निवडणूक लढत आहोत असं भुजबळ म्हणाले. आपल्या भुमिकेमुळे महायुतीला अडचण होऊ नये म्हणून राजीनामा दिल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

धुळे शहराचे माजी आमदार अनिल गोटे यांनी आज मातोश्रीवर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. धुळे शहर विधानसभेसाठी महाविकास आघाडीचा उमेदवार आपणच असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

<><><><><>

नाशिक शहरातला चारही मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उमेदवार जाहीर केल्याने काँग्रेसने नाराजी व्यक्त केली आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी आज नाशिकमधल्या काँग्रेस भवनला कुलूप लावून आपला संताप व्यक्त केला. पक्षाचेच काही नेते पक्षाला संपवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी यावेळी केला.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी म्हणजे २० नोव्हेंबरला राज्य सरकारनं सुटी जाहीर केली आहे. सर्व सरकारी, खासगी, औद्योगिक आस्थापनांना या दिवशी सुटी द्यावी लागेल आणि त्या दिवसाचं वेतन संबंधित कर्मचाऱ्याला द्यावं लागेल. अपवादात्मक परिस्थितीत सुटी देणं शक्य नसेल तर जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन किमान २ तास उशिरा येण्याची किंवा लवकर जाण्याची सवलत कर्मचाऱ्यांना द्यावी लागेल. या तरतुदींचं उल्लंघन करणाऱ्यांवर निवडणूक आयोगाच्या नियमानुसार कारवाई केली जाईल.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीवर विशेष भर देण्यात येत आहे. निवडणूक कार्यालयांच्या स्वीप पथकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पथकांमार्फतही येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजावण्याचं आवाहन करण्यात येत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे उद्यानं, बाजारपेठा, शैक्षणिक संस्था इत्यादी ठिकाणी मतदार जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थी  आणि पालकांमध्ये जनजागृतीसाठी मुंबई विद्यापीठानं पुढाकार घेतला आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **मुंबई पश्चिम उपनगरातल्या** मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीनं ६ हजार ७९८ कोटी रुपये किमतीच्या २ रेल्वे प्रकल्पांना मंजुरी दिली. नरकटियागंज ते दरभंगा, सितामढी-मुझफ्फरपूर तसंच एरुपलेम-नामबुरू या दरम्यान हे रेल्वे मार्ग आहेत. यामुळं नेपाळ, ईशान्य भारतात दळणवळण सुविधा सुधारतील.

येत्या ५ वर्षात अवकाश क्षेत्रासाठी १ हजार कोटी रुपयांच्या व्हेंचर कॅपिटल फंडालाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. याअंतर्गत वर्षाला सरासरी दीडशे ते अडीचशे कोटी रुपये दिले जातील.

**<><><><><>**

राज्य सरकारच्या सेवेतल्या कर्मचाऱ्यांना चालू महिन्याचं वेतन आणि निवृत्तीवेतन उद्यापर्यंत मिळणार आहे. यासंदर्भातल्या विविध प्रणालींमधला डेटा टाटा कम्युनिकेशन्सकडून महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडे हस्तांतरित केला जातोय. त्यासाठी पुढच्या आठवड्यात या प्रणाली बंद राहणार असल्यानं लवकर वेतन देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. जिल्हापरिषद, विद्यापीठ, विविध शैक्षणिक संस्था यातल्या कर्मचाऱ्यांनाही यंदा लवकर वेतन मिळेल.

**<><><><><>**

बहुजन समाज पार्टी द्वारे आज विधानसभा निवडणुकीसाठी ६२ उमेदवारांची पहिली यादी जारी करण्यात आली आहे.  यात बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव मधून विजय वाघमारे, अकोला जिल्ह्यातील बाळापुर मधून भाग्यश्री गवई, अकोला पश्चिम मतदारसंघातून डॉक्टर धनंजय नालट यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नागपूर उत्तर मधून बुद्धम राऊत आणि यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड मधून सुभाष रणवीर यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २७ तारखेला मन की बात या आकाशवाणीवरच्या कार्यक्रमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमाचा हा ११५ वा भाग आहे. श्रोते येत्या २५ तारखेपर्यंत टोल फ्री क्रमांक, नमो ॲप किंवा मायजीओव्ही ओपन फोरम वरून आपली मतं, सूचना पाठवू शकतात.

**<><><><><>**

न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या आजच्या पहिल्या दिवसअखेर भारतानं १ बाद १६ धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मा लवकर बाद झाला. शुभमन गिल १० आणि यशस्वी जयस्वाल ६ धावांवर खेळत होते. त्यापूर्वी न्यूझीलंडच्या संघाने सर्वबाद २५९ धावा केल्या. न्यूझीलंडकडून डेव्हन कॉनवेने ७६ तर रचिन रवींद्रने ६५ धावांची खेळी केली. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने ५ तर रविचंद्रन अश्विनने ३ गडी बाद केले. तीन सामन्यांच्या मालिकेत न्यूझीलंडनं बंगळुरू इथला पहिला कसोटी सामना जिंकला आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या तीन सामन्याच्या मालिकेतला पहिला एकदिवसीय सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सुरू आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत सर्वबाद २२७ धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या ४ बाद 107 धावा झाल्या होत्या.